21 SEP 2024 पुढारी जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महिलांना सुरक्षित पर्यावरण प्रदान करण्याची सर्वांची जबाबदारी

## अतिरिक्त जिल्हाधिकारी शिंदे; विद्यापीठात विभागस्तरीय कार्यशाळा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

महिलांना सुरक्षित सामाजिक पर्यावरण उपलब्ध करून देणे ही सर्वच समाजघटकांची जबाबदारी आहे, असे प्रतिपादन कोल्हापूरचे अतिरिक्त जिल्हाधिकारी संजय शिंदे यांनी केले.

महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग व शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने 'महिला सुरक्षितता व शिष्यवृत्ती' या विषयावर आज एकदिवसीय विभागस्तरीय कार्यशाळेत प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. विभागीय उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. अशोक उबाळे, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे प्रमुख उपस्थित होते.

संजय शिंदे म्हणाले, समाजातील सर्वच स्त्रियांप्रती आपला दृष्टिकोन हा संवेदनशील असला पाहिजे. महिला सुरक्षा धोरणाच्या अंमलबजावणीबाबत शासन व पोलिस गंभीर आहेत. तथापि, बदनामीला घाबरून सुमारे ८० टक्के तक्रारी दाखल होत नाहीत. समाज एकजुटीने महिलांच्या पाठीशी उभा राहिला, तर हे चित्र बदलणे सहजशक्य आहे.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित विभागस्तरीय कार्यशाळेच्या उद्घाटन समारंभात बोलताना अतिरिक्त जिल्हाधिकारी संजय शिंदे. सोबत डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. अशोक उबाळे, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. तानाजी चौगुले आदी. (छाया : नाज ट्रेनर)**

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विद्यार्थिनींच्या पालकांचा विद्यापीठे, महाविद्यालये आदी शिक्षण संस्थांवर विश्वास असतो. या परिसरात, तेथील वसतिगृहात पाल्याची योग्य काळजी घेतली जाईल, असे त्यांना वाटते. त्यामुळे आपल्याकडे शिकणाऱ्या प्रत्येक विद्यार्थिनीच्या बाबतीत आपण सर्वच जण पालक आहोत, ही भावना घेऊन त्यांच्या सुरक्षिततेची काळजी घेणे आपले कर्तव्य आहे. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी प्रास्ताविक केले. विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले यांनी आभार मानले.

दिवसभरातील विविध सत्रांमध्ये महिला सुरक्षेच्या अनुषंगाने सहायक पोलिस निरीक्षक स्वाती यादव, संकटसमयी मदत घेण्याच्या अनुषंगाने निर्भया पथक प्रमुख पोलिस निरीक्षक क्रांती पाटील, महिला सुरक्षाविषयक कायद्यांच्या अनुषंगाने ॲड. आसावरी कुलकर्णी, विशाखा मार्गदर्शक तत्त्वांच्या अनुषंगाने डॉ. भारती पाटील व राजर्षी शाहू शिष्यवृत्तीच्या अनुषंगाने डॉ. अशोक उबाळे यांनी मार्गदर्शन केले.

जनसंपर्क कक्ष
21 SEP 2024
लोकमत
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महिलांच्या पाठीशी एकजुटीने उभे राहावे

## संजय शिंदे : शिवाजी विद्यापीठात विभागस्तरीय कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** बदनामीला घाबरून महिलांविषयी सुमारे ८० टक्के तक्रारी दाखल होत नाहीत. समाज एकजुटीने महिलांच्या पाठीशी उभा राहिला, तर हे चित्र बदलणे सहज शक्य आहे, असा विश्वास अतिरिक्त जिल्हाधिकारी संजय शिंदे यांनी व्यक्त केला.

राज्य शासनाचा उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या वतीने 'महिला सुरक्षितता व शिष्यवृत्ती' या विषयावर शुक्रवारी विभागस्तरीय कार्यशाळेत ते बोलत होते. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील व विभागीय उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. अशोक उबाळे, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे प्रमुख उपस्थित होते.




शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी आयोजित कार्यशाळेत संजय शिंदे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. अशोक उबाळे, कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. प्रमोद पाटील, डॉ. तानाजी चौगुले, स्वाती यादव उपस्थित होते.

डॉ. शिर्के म्हणाले, विद्यापीठे, महाविद्यालये आदी शिक्षण संस्थांवर पालकांचा विश्वास असतो. या परिसरात, वसतिगृहांत पाल्याची योग्य काळजी घेतली जाईल, असे त्यांना वाटते. प्रत्येक विद्यार्थिनीच्या बाबतीत सर्वच पालक आहोत, ही भावना घेऊन त्यांच्या सुरक्षिततेची काळजी घेणे कर्तव्य आहे. डॉ. प्रमोद पाटील यांनी स्वागत केले. विविध सत्रांमध्ये सहायक पोलिस निरीक्षक स्वाती यादव, पोलिस निरीक्षक क्रांती पाटील, ॲड. आसावरी कुलकर्णी, डॉ. भारती पाटील, डॉ. उबाळे यांनी मार्गदर्शन केले.

21 SEP 2024 सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सुरक्षित पर्यावरण देण्याची जबाबदारी सर्वांचीच

## शिंदे : 'महिला सुरक्षितता व शिष्यवृत्ती'वर विद्यापीठात कार्यशाळा

■ **सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २० : महिलांना सुरक्षित सामाजिक पर्यावरण उपलब्ध करून देणे ही सर्वच समाज घटकांची जबाबदारी आहे, असे प्रतिपादन अतिरिक्त जिल्हाधिकारी संजय शिंदे यांनी आज येथे केले.

उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि शिवाजी विद्यापीठातर्फे 'महिला सुरक्षितता व शिष्यवृत्ती' या विषयावर आयोजित विभागस्तरीय कार्यशाळा विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सिनेट सभागृहात घेण्यात आली. त्यात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, तर विभागीय उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. अशोक उबाळे, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे प्रमुख उपस्थित होते.




कोल्हापूर : 'महिला सुरक्षितता व शिष्यवृत्ती' या विषयावर शुक्रवारी आयोजित विभागस्तरीय कार्यशाळेच्या उद्‌घाटन कार्यक्रमात बोलताना अतिरिक्त जिल्हाधिकारी संजय शिंदे. शेजारी डावीकडून डॉ. व्ही. एन. शिंदे, अशोक उबाळे, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, तानाजी चौगुले, स्वाती यादव.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विद्यार्थिनींच्या पालकांचा विद्यापीठ, महाविद्यालय, आदी शिक्षण संस्थांवर विश्वास असतो. त्यामुळे आपल्याकडे शिकणाऱ्या प्रत्येक विद्यार्थिनीच्या बाबतीत आपण सर्वच जण पालक आहोत, ही भावना घेऊन त्यांच्या सुरक्षिततेची काळजी घेणे आपले कर्तव्य आहे.' प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी स्वागत केले. विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले यांनी आभार मानले.

### महिला सुरक्षा, शिष्यवृत्तीबाबत मार्गदर्शन

उदघाटनानंतरच्या सत्रांमध्ये महिला सुरक्षेबाबत सहायक पोलिस निरीक्षक स्वाती यादव, संकटसमयी मदत घेण्याबाबत निर्भया पथकप्रमुख पोलिस निरीक्षक क्रांती पाटील, महिला सुरक्षाविषयक कायद्यांच्या अनुषंगाने ॲड. आसावरी कुलकर्णी, विशाखा मार्गदर्शक तत्त्वांच्या अनुषंगाने डॉ. भारती पाटील, राजर्षी शाहू शिष्यवृत्तीबाबत डॉ. उबाळे यांनी मार्गदर्शन केले.

21 SEP 2024

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

अमेरिकेतील स्टॅनफोर्ड विद्यापीठाकडून यादी जाहीर

# जागतिक दोन टक्के संशोधकांत विद्यापीठाचे १४ संशोधक

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : जगभरातील आघाडीच्या दोन टक्के संशोधकांची सन २०२४ साठीची यादी अमेरिकेतील स्टॅनफोर्ड विद्यापीठाने नुकतीच जाहीर केली. यात शिवाजी विद्यापीठाच्या १४ संशोधकांनी स्थान प्राप्त केले.

स्टॅनफोर्ड विद्यापीठाच्या जागतिक आघाडीच्या दोन टक्के संशोधकांत विद्यापीठाचे प्र-कुलगुरू तथा ज्येष्ठ संशोधक डॉ. प्रमोद पाटील (पदार्थविज्ञान) यांच्यासह निवृत्त प्रा. ए. व्ही. राव (पदार्थविज्ञान), निवृत्त प्रा. सी. एच. भोसले (पदार्थविज्ञान), निवृत्त प्रा. एस. पी. गोविंदवार (जैवरसायनशास्त्र), डॉ. केशव राजपुरे (पदार्थविज्ञान), डॉ. ज्योती जाधव (जैवरसायनशास्त्र), डॉ. ए. व्ही. मोहोळकर (पदार्थविज्ञान), डॉ. सागर डेळेकर (रसायनशास्त्र), प्रा. के. एम. गरडकर (रसायनशास्त्र), डॉ. टी. डी. डोंगळे (नॅनोसायन्स), डॉ. सुशीलकुमार जाधव (नॅनोसायन्स), डॉ. हेमराज यादव (रसायनशास्त्र) आणि संलग्नित महाविद्यालयांतील संशोधक डॉ. व्ही. एल. पाटील (पदार्थविज्ञान) व डॉ. एस. ए. व्हनाळकर (पदार्थविज्ञान) यांचा समावेश आहे.



विद्यापीठातील १४ संशोधकांनी जागतिक आघाडीच्या दोन टक्के संशोधकांत स्थान प्राप्त केले. त्यांचा कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. यावेळी डॉ. के. एम. गरडकर, डॉ. ज्योती जाधव, डॉ. एस. पी. गोविंदवार, डॉ. सी. एच. भोसले, डॉ. प्रकाश राऊत, डॉ. केशव राजपुरे, डॉ. प्रमोद पाटील, डॉ. व्ही. एन. शिंदे, आदी उपस्थित होते

## स्टॅनफोर्डचे रँकिंग

स्टॅनफोर्ड विद्यापीठाने शोधनिबंधाला मिळणारी सायटेशन्स, एच निर्देशांक, सहलेखकत्व, संशोधन लेखकाची नेमकी भूमिका या घटकांचा सारासार विचार करून क्रमवारी प्रसिद्ध केली. या यादीसाठी १९६० ते २०२४ या कालावधीमध्ये संशोधकीय योगदान देणाऱ्या संशोधकांची सार्वकालिक कामगिरी आणि वार्षिक कामगिरी अशा दोन निकषांवर निवड केली.

21 SEP 2024 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जागतिक आघाडीच्या दोन टक्के संशोधकांत शिवाजी विद्यापीठाचे १४ संशोधक



**कोल्हापूर :** जगभरातील आघाडीच्या २ टक्के संशोधकांची २०२४ या वर्षाची यादी अमेरिकेतील स्टॅनफोर्ड विद्यापीठाने नुकतीच जाहीर केली. या यादीत शिवाजी विद्यापीठाच्या १४ संशोधकांनी स्थान प्राप्त केले आहे. गेली ५ वर्षे सातत्याने शिवाजी विद्यापीठाचे संशोधकीय स्थान जगाच्या नकाशावर हे संशोधक अधोरेखित करत आहेत, ही अत्यंत समाधानाची व आनंदाची बाब आहे, असे गौरवोद्गार कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी व्यक्त केले.

स्टॅनफोर्ड विद्यापीठाच्या जागतिक आघाडीच्या दोन टक्के संशोधकांत शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू तथा ज्येष्ठ संशोधक डॉ. प्रमोद पाटील (पदार्थ विज्ञान) यांच्यासह निवृत्त प्रा. ए. व्ही. राव (पदार्थ विज्ञान), निवृत्त प्रा. सी. एच. भोसले (पदार्थ विज्ञान), निवृत्त प्रा. एस. पी. गोविंदवार (जैवरसायनशास्त्र), डॉ. केशव राजपुरे (पदार्थ विज्ञान), डॉ.ज्योती जाधव (जैवरसायनशास्त्र), डॉ. ए. व्ही. मोहोळकर (पदार्थ विज्ञान), डॉ. सागर डेळेकर (रसायनशास्त्र), प्रा. के. एम. गरडकर (रसायनशास्त्र), डॉ. टी. डी. डोंगळे (नॅनोसायन्स), डॉ. सुशीलकुमार जाधव (नॅनोसायन्स), डॉ. हेमराज यादव (रसायनशास्त्र) आणि संलग्नित महाविद्यालयांतील संशोधक डॉ. व्ही. एल. पाटील (पदार्थ विज्ञान) व डॉ. एस. ए. व्हनाळकर (पदार्थ विज्ञान) यांचा समावेश आहे. या संशोधकांचा विद्यापीठ कार्यालयात कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते ग्रंथभेट व पुष्प देऊन सत्कार करण्यात आला.

कुलगुरू डॉ. शिर्के या वेळी म्हणाले, संशोधकांनी संशोधनाची एक शिस्त निर्माण केली, त्याला सर्वच कुलगुरूंनी मोलाची प्रशासकीय साथ दिली. त्यामुळे एक उत्तम संशोधन परंपरा शिवाजी विद्यापीठात निर्माण झाली आहे. या वेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील म्हणाले, या १४ संशोधकांव्यतिरिक्त राज्यासह जगभरात अन्य शिक्षण संस्था, विद्यापीठांत कार्यरत असणारे शिवाजी विद्यापीठाचे अनेक माजी विद्यार्थीही या दोन टक्के संशोधकांत समाविष्ट आहेत.

या वेळी डॉ. सागर डेळेकर यांनी प्रास्ताविक केले, तर एसयूके रिसर्च अँड डेव्हलपमेंट फाऊंडेशन या सेक्शन-८ कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. प्रकाश राऊत यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
21 SEP 2024
पुढारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ग्राहकांना आशयात गुंतवण्याची क्षमता विकसित करा

## आदित्य पिंपळे; विद्यापीठात डिजिटल मीडियाच्या उत्पन्नाचे स्त्रोत यावर कार्यशाळा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

ओरिजनल, उपयुक्त व रोचक आशय दिल्यास डिजिटल माध्यमांत ग्राहक जास्तीत-जास्त वेळ गुंतून राहतो. ग्राहक जितका जास्त वेळ माध्यमात रमतील, तितके डिजिटल माध्यमांचे उत्पन्न वाढण्याची शक्यता वाढते. यासाठी ग्राहकांना आशयात गुंतवण्याची क्षमता विकसित करा, असे आवाहन झी इंटरनॅशनलच्या विऑन वृत्तवाहिनीचे क्रीडा विश्लेषक आदित्य पिंपळे यांनी केले.




**कोल्हापूर : कार्यशाळेत बोलताना आदित्य पिंपळे व गणेश गायकवाड.**

शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या वतीने आयोजित 'डिजिटल माध्यमांच्या उत्पन्नाचे स्रोत' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेत ते बोलत होते.

पिंपळे म्हणाले, डिजिटल माध्यमांसाठी आशय तगडा लागतोच; परंतु त्याला आक्रमक मार्केटिंगची जोड हवी. पारंपरिक पद्धतीचा आशय न देता वेगळा विचार करून ग्राहकांच्या गरजा लक्षात घेऊन आशयनिर्मिती व्हावी. डिजिटल प्लॅटफॉर्म सातत्याने धोरणे बदलतात. ते विचारात घेऊन आशय निर्मिती व्हावी. सर्च इंजिन ऑप्टिमायजेशन, हॅशटॅग, कीवर्डस्‌चा वापर करून स्टोरी बुस्ट करता येते. आशयनिर्मिती करताना तांत्रिक बाबींकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे.

सोलापूर येथील एबी न्यूजचे संपादक गणेश गायकवाड म्हणाले, डिजिटल माध्यमांतून उत्पन्न मिळविण्यासाठी आवड, सातत्य, संयम आणि प्रचंड मेहनत घेण्याची तयारी असली पाहिजे. डिजिटल माध्यमांचा ग्राहक भारतात मोठ्या प्रमाणात आहे, पण या ग्राहकांच्या आवडीनिवडी समजून घेणे आवश्यक आहे.

अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रेरणा पाटील हिने सूत्रसंचालन केले. ऋषिकेश गोळे यांनी आभार मानले. यावेळी अनुप जत्राटकर, डॉ. सुमेधा साळुंखे, जयप्रकाश पाटील आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 SEP 2024
सकाळ

# दोन हजार विद्यार्थ्यांना प्रवेशाची 'विशेष संधी'

## विद्यापीठाच्या अधिकार मंडळाचा निर्णय

■ **सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २० : शिवाजी विद्यापीठातील संलग्नित महाविद्यालये आणि अधिविभागातील सर्व शाखाअंतर्गत असणाऱ्या सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षेतील अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना पुढील वर्षातील प्रवेशाबाबत विशेष संधी (कॅरिऑन) मिळणार आहे. त्याबाबतचा निर्णय विद्यापीठाच्या अधिकार मंडळाने घेतला आहे.

या निर्णयामुळे विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील सुमारे दोन हजार विद्यार्थ्यांना या विशेष प्रवेश संधीचा लाभ घेता येणार आहे. त्यात अभियांत्रिकी अभ्यासक्रमाचे १ हजार ४००, विधी (लॉ) अभ्यासक्रमाचे १५० आणि उर्वरित अभ्यासक्रमांच्या ४५० विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार देण्यात येणारे प्रवेश हे तात्पुरत्या स्वरूपाचे असतील. हिवाळी सत्रातील परीक्षेमध्ये अनुत्तीर्ण वर्षाची परीक्षा उत्तीर्ण झाल्यास अथवा एटीकेटी मिळाल्यास त्या विद्यार्थ्यांचा प्रवेश कायम ठेवला जाणार आहे.

या अभ्यासक्रमांना प्रवेशाबाबतचे संबंधित शिखर संस्थेचे विशिष्ट असे नियम असल्यास ते नियम बंधनकारक राहणार आहेत. ज्या अभ्यासक्रमास पुनर्परीक्षा आयोजित करण्याबाबतची तरतूद आहे, अशा अभ्यासक्रमांच्या अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना पुढील वर्षामध्ये प्रवेशाबाबत विशेष संधीची सुविधा मिळणार नाही.

या विशेष प्रवेश संधीनुसार प्रवेश देताना विद्यापीठ कायद्यातील तरतुदी, नियम, अटींचे पालन महाविद्यालय आणि अधिविभागांनी करणे बंधनकारक आहे आदी स्वरूपातील सूचना विद्यापीठाने आज परिपत्रकाद्वारे अधिविभागप्रमुख आणि संलग्नित महाविद्यालयांच्या प्राचार्यांना केली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 SEP 2024
सकाळ

# जयसिंगपूर महाविद्यालयात आज विद्यापीठाचा युवा महोत्सव

## ७६ महाविद्यालये, १५१३ कलाकारांचा सहभाग

जयसिंगपूर, ता. २० : शिवाजी विद्यापीठाचा ४४ वा एकदिवसीय जिल्हास्तरीय युवा महोत्सव शनिवारी (ता. २०) जयसिंगपूर कॉलेजमध्ये होणार आहे. महोत्सवात वैयक्तिक व सांघिक कला प्रकारांचे सादरीकरण केले जाणार असून, यामध्ये लोकनृत्य, लोककला, मूकनाट्य, लघुनाटिका, लोकसंगीत, एकल लोकवाद्य वादन, वादविवाद, मराठी, हिंदी व इंग्रजी वक्तृत्व, पथनाट्य, प्रश्नमंजुषा, एकांकिका, सुगम गायन, भारतीय समूहगीत आणि एकपात्री अभिनय अशा स्पर्धा होणार आहेत.

महोत्सवाची तयारी पूर्ण झाली असून, कोल्हापूर जिल्ह्यातील ७६ महाविद्यालयांनी सहभाग नोंदवला आहे. युवा महोत्सवातील विविध कला प्रकारांत १२२० कलाकार विद्यार्थी, १४० संघ व्यवस्थापक, १५३ साथीदार असे एकूण १५१३ जण सहभागी होत आहेत. युवा महोत्सवातील सर्व कामे पूर्ण झाल्याची माहिती प्राचार्य डॉ. सूरत मांजरे यांनी दिली.

महोत्सवासाठी कोल्हापूर जिल्ह्यातील शिवाजी विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांतील शेकडो प्राध्यापक व कलाकार विद्यार्थी विविध स्पर्धा प्रकारांमध्ये सहभागी होणार आहेत. महोत्सवाचे उद्‌घाटन शनिवारी सकाळी साडेनऊ वाजता प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते होईल. याप्रसंगी विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक डॉ. तानाजी चौगुले, शिवाजी विद्यापीठ युवा महोत्सव संयोजन समितीमधील पदाधिकारी, सदस्य, कोल्हापूर जिल्हा समन्वयक डॉ. आर. एच. अतिग्रे उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुभाष अडदंडे, सचिव डॉ. महावीर अक्कोळे, प्रा. डॉ. विजयमाला चौगुले सदस्य उपस्थित राहणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 SEP 2024
पुढारी

# आता सर्व शाखांतील परीक्षांमध्ये अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना 'कॅरी ऑन'

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ संलग्न महाविद्यालये, अधिविभागातील सर्व शाखांत सर्व कोर्सेस व अभ्यासक्रमाच्या परीक्षांमध्ये अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना पुढील वर्षामध्ये प्रवेशासंदर्भात विशेष प्रवेश संधी (कॅरी ऑन) देण्यास विद्यापीठ अधिकार मंडळाने मान्यता दिली आहे.

**शिवाजी विद्यापीठाचा महत्त्वपूर्ण निर्णय**

यासंदर्भातील परिपत्रक उपकुलसचिव डॉ. एम. एस. कबूल यांनी काढले आहे.

यापुढे विद्यापीठ संलग्नित महाविद्यालये व अधिविभागामध्ये सुरू असणाऱ्या सर्व अभ्यासक्रमांच्या अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना पुढील वर्षामध्ये संधी देण्यात आली आहे. विशेष प्रवेश संधी निर्णयानुसार देण्यात येणारे प्रवेश हे तात्पुरत्या स्वरूपाचे देण्यात यावेत. हिवाळी सत्र परीक्षेत अनुत्तीर्ण वर्षाची परीक्षा उत्तीर्ण झाल्यास तसेच एटीकेटी मिळाल्यास संबंधित विद्यार्थ्यांचा प्रवेश कायम राहील. ज्या अभ्यासक्रमास पुनर्परीक्षा आयोजित करण्याची तरतूद आहे, अशा अभ्यासक्रमाच्या अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना पुढील वर्षामध्ये प्रवेशासाठी विशेष संधी सुविधा देण्यात येऊ नये, असे परिपत्रकात म्हटले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 SEP 2024
लोकमत

# अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना कॅरी ऑनची संधी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील संलग्नित महाविद्यालये व अधिविभागातील सर्व शाखांतर्गत अभ्यासक्रमांच्या परीक्षेमध्ये अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना पुढील वर्षाच्या प्रवेशासंदर्भात विशेष प्रवेश संधी (कॅरी ऑन) देण्यात येणार आहे. विद्यापीठाच्या अधिकार मंडळानेच याला मान्यता दिली आहे. हे प्रवेश तात्पुरत्या स्वरुपाचे असून, हिवाळी सत्र परीक्षेमध्ये अनुत्तीर्ण वर्षाची परीक्षा उत्तीर्ण झाल्यास या विद्यार्थ्यांचे प्रवेश कायम ठेवण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 SEP 2024
तरुण भारत

# 'विकसित भारतासाठी संशोधनाची गरज'

**कोल्हापूर :** विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी समाजोपयोगी संशोधनाची गरज आहे, असे प्रतिपादन सीआरटीडी, सिंहगड इन्स्टिट्यूटचे संचालक डॉ. एस. एच. पवार यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील भौतिकशास्त्र अधिविभाग आणि पुण्यातील इंटर–युनिव्हर्सिटी सेंटर फॉर अॅस्ट्रॉनॉमी अँड अॅस्ट्रोफिजिक्स यांच्या संयुक्त विद्यमाने, आयोजित कार्यशाळेत ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. आयुकाचे डॉ. एस. मित्रा, विभागप्रमुख डॉ. आर. जी. सोनकवडे, यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. एस. पी. दास यांनी स्वागत केले. साक्षी काळे, साधना परीट यांनी सुत्रसंचालन केले. डॉ. व्ही. एस. कुंभार यांनी आभार मानले. डॉ. के. वाय. राजपुरे, डॉ. ए. व्ही. मोहोळकर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 SEP 2024
लोकमत

# जयसिंगपुरात रंगणार आज जिल्हास्तरीय युवा महोत्सव

## जयसिंगपूर महाविद्यालयाला यजमानपद

लोकमत न्यूज नेटवर्क

**जयसिंगपूर :** शिवाजी विद्यापीठाचा ४४वा एकदिवसीय जिल्हास्तरीय युवा महोत्सव आज, शनिवारी (दि. २१) जयसिंगपूर महाविद्यालयात होणार आहे. महोत्सवात वैयक्तिक व सांघिक कला प्रकारांचे सादरीकरण केले जाणार आहे. यामध्ये लोकनृत्य, लोककला, मूकनाट्य, लघु नाटिका, लोकसंगीत, एकल लोकवाद्य वादन, वादविवाद, मराठी, हिंदी व इंग्रजी वक्तृत्व, पथनाट्य, प्रश्नमंजूषा, एकांकिका, सुगम गायन, भारतीय समूहगीत आणि एकपात्री अभिनय अशा स्पर्धा होणार आहेत, अशी माहिती प्राचार्य डॉ. सुरत मांजरे व लोकल समितीचे सचिव डॉ. महावीर अक्कोळे यांनी बुधवारी पत्रकार बैठकीत दिली.

युवामहोत्सव स्पर्धेचे जिल्हास्तरीय यजमानपद जयसिंगपूर महाविद्यालयाला मिळाले आहे. महोत्सवाचे उद्‌घाटन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरु प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते होणार आहे. याप्रसंगी विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक डॉ. तानाजी चौगुले, शिवाजी विद्यापीठ युवामहोत्सव संयोजन समितीमधील पदाधिकारी, सदस्य, कोल्हापूर जिल्हा समन्वयक डॉ. आर. एच. अतिग्रे उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुभाष अडदंडे, सचिव डॉ. महावीर अक्कोळे, स्थानिक संयोजन समिती प्रमुख प्राचार्य डॉ. सूरत मांजरे, स्थानिक संयोजन सचिव प्रा. डॉ. सौ. विजयमाला चौगुले यांच्यासह सदस्य उपस्थित राहणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 SEP 2024
तरुण भारत

# हलकर्णी महाविद्यालयात अंगणवाडी कोर्सचे उद्घाटन

**गडहिंग्लज :** तांबाळेश्वर शिक्षण संचलित हलकर्णी येथील महाविद्यालयात अंगणवाडी कोर्सचा शुभारंभ करण्यात आला. शिवाजी विद्यापीठांतर्गत कोर्स सुरू करण्यात आला आहे. यावेळी प्रकल्प अधिकारी कितींदिवी सावंत यांनी सांगितले. कार्यक्रमावेळी संस्थेचे अध्यक्ष एम. जी. पाटील, सेक्रेटरी आर. जी, पाटील, प्राचार्या बी. बी. मुल्ला, मान्यवर उपस्थित होते.

21 SEP 2024 पुण्यनगरी - शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



विज्ञान-तंत्रज्ञान

# लेझर रोषणाई घातकच!

डॉ. व्ही.एन. शिंदे

गणपती बाप्पा आले. दहा दिवसांचा मुक्काम संपवून गेले. दहा दिवस सर्वत्र मंगलमय वातावरण, मनाला प्रसन्न करणारे. बाप्पा येणार, याची चाहूल अनेक दिवस अगोदर लागते. स्टॉलमधल्या राख्यांची जागा बाप्पांच्या मूर्तींनी घेतली की बाप्पाचे आगमन जवळ आल्याची जाणीव होते. मग त्यांच्या आगमनाची तयारी. ढोलताशा, रोषणाईसाठी दिवे सगळे ठरवले जायचे. मग मिरवणूक निघते. बाप्पाचे येणे धूमधडाक्यात असते. मिरवणूक छान असायची. पुढे फटाक्यांनी प्रवेश केला. ढोलताशा बाजूला सरकला आणि त्याची जागा दणकेबाज लाऊडस्पीकर्सनी घेतली. छान माळांची, विद्युत रोषणाईही बाजूला सरली आणि लेझर बीमचा झगमगाट आला. यामध्ये कोल्हापूरजवळच्या उचगावमधील एका युवकाच्या डोळ्याला लेझर बीममुळे इजा झाली. एक डोळा निकामी झाला. त्यानंतर कोल्हापूर जिल्हा प्रशासनाने गणपती विसर्जन मिरवणुकीत लेझर रोषणाईला बंदी घातली. अतिशय महत्त्वाचा असा मानला गेलेला लेझरचा शोध चर्चेत आला.

लेझर हा शब्द 'लाईट ॲम्प्लिफिकेशन बाय स्टिम्युलेटेड इमिशन ऑफ रॅडिएशन' या प्रक्रियेसाठीच्या शब्दसमूहाचे लघुरूप आहे. काही पदार्थातील अणू किंवा रेणूंना प्रथम ऊर्जा देण्यात येते. अणू किंवा रेणू जेव्हा ती ऊर्जा बाहेर टाकतात, तेव्हा या सर्व प्रकाश कणांची ऊर्जा सारखीच असते. अशा प्रकारे ऊर्जा बाहेर टाकणाऱ्या उपकरणास, प्रक्रियेस आणि प्रकाश शलाकेस लेझर म्हणून ओळखले जाते. अन्य प्रकाश साधनांमधून बाहेर पडणारे प्रकाशकण विविध ऊर्जा घेऊन बाहेर पडतात. लेझरमधील सर्व प्रकाशतरंगांची वारंवारिता आणि सर्व कणांची ऊर्जा सारखी असते. अन्य विद्युत दिव्यामध्ये प्रकाश सर्व बाजूंनी बाहेर पडतो, लेझरचा प्रकाश मात्र एकाच बाजूने बाहेर पडतो. लेझरची तरंगलांबी कितीही असू शकते. मात्र, ती मायक्रोवेव्हजच्या पट्ट्यातील असल्यास त्यांना मेसर असे म्हणतात. इतर प्रकाश शलाका प्रवास करताना पसरत जातात. लेझर शलाका मात्र पसरत नाहीत. वेगवेगळी ऊर्जा असणाऱ्या लेझर किरणांची निर्मिती होते.

लेझर किरण निर्मितीची संकल्पना अल्बर्ट आईनस्टाईन यांनी १९१७ मध्ये सैद्धांतिक गणितातून मांडली. मात्र, त्यांनी त्याच्या अन्य गुणधर्माबाबत आणि उपयुक्ततेबाबत फारसे काही नमूद केले नाही. हे सर्व सैद्धांतिक पातळीवरच अनेक वर्ष राहिले. पुढे १९५० मध्ये अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठातील प्राध्यापक सी. एच. टाऊन्स यांनी यावर संशोधन केले. मात्र, त्यांना मायक्रोवेव्ह टप्प्यातील असे किरण तयार करण्यात यश मिळाले. याचवेळी रशियामध्ये एन. जी. बासव्ह आणि ए. एम. प्राचोराव्ह यांनी यावर संशोधन केले. संकल्पना विकसित केली. मात्र, पहिले लेझर निर्मितीचे श्रेय टी. एस. मैमान यांना जाते. त्यांनी १९६० मध्ये पहिला लेझर कार्यान्वित केला. टाऊन्स, बासव्ह आणि प्राचारोव्ह यांना १९६४ चा नोबल पुरस्कार विभागून देण्यात आला. ए. एल. शॉलो यांनी याच विषयावर पुढे संशोधन केले आणि लेझरच्या उपयुक्ततेबाबत संशोधन केले. यासाठी त्यांना १९८१ चा भौतिकशास्त्राचा नोबेल पुरस्कार देण्यात आला.



सी. एच. टाऊन्स



एन. जी. बासव्ह



ए. एम. प्राचोराव्ह

दोन नोबेल पुरस्कार प्राप्त करणारा शोध खरोखरच मानवासाठी वरदान ठरला. लेझरमध्ये असणाऱ्या सर्व प्रकाश कणांची ऊर्जा सारखीच असल्याने आणि ते पसरत नसल्याने ते जेथे आदळतात त्या ठिकाणी ते शोषले जातात. त्यामुळे तेथे प्रचंड ऊर्जा तयार होते. त्यामध्ये उच्च तापमान तयार होते. याचा वापर करून धातूचे पत्रे कापणे, छपाई करणे असे अनेक उपयोग सुरू झाले. होलोग्राम तयार करण्यासाठी, तापमापी म्हणूनही लेझरचा वापर सुरू झाला. लेझर किरण जास्त पसरत नसल्याने त्यांचा उपयोग विमानाच्या दळणवळणामध्ये संकेत देण्यासाठी करण्यात येतो. लेझर बीमच्या उष्णता निर्माण करण्याच्या गुणधर्मामुळे त्याचा वापर वैद्यकीय शास्त्रामध्ये सर्जरीसाठी करण्यात येऊ लागला. लेझरच्या अलौकिक गुणधर्मामुळे त्याचे अनेक उपयोग सुरू झाले. जसा लेझरचा उपयोग छपाईसाठी सुरू झाला तसाच बारकोड वाचण्यासाठीही सुरू झाला. फायबर ऑप्टिक दळणवळणासाठीही लेझरचा वापर सुरू झाला. संगणकासारख्या अत्यंत महत्त्वाच्या आणि कमी ऊर्जा लागणाऱ्या तंत्रज्ञानातही लेझर वापरले जाऊ लागले. संगणकाचा डिस्क ड्राईव्ह वाचण्यासाठी आणि नोंदी करण्यासाठी लेझरचा वापर करण्यात येतो. त्याचप्रमाणे बोर्ड बनवण्यासाठीही लेझर तंत्राचा वापर करण्यात येतो. एकूणच हे तंत्रज्ञान मानवासाठी, विज्ञान तंत्रज्ञानाच्या प्रगतीसाठी वरदान बनले आहे.

लेझरच्या गुणधर्मामुळे हा व्यवसाय खूप मोठ्या प्रमाणात वाढला आहे. २००४ साली अमेरिकेत लेझर डायोड नसलेली १,३१,००० इतकी उपकरणे विकली गेली. त्यांचे मूल्य २.१९ अब्ज डॉलर इतके आहे. डायोड लेझरयुक्त ७,३३० लक्ष इतकी उपकरणे विकण्यात आली. यांचे मूल्य ३.२० अब्ज डॉलर इतके आहे. या लेझर उपकरणांची ऊर्जा भिन्न असते. कोणत्या कारणासाठी लेझर वापरले जाणार आहेत, त्यानुसार त्यांची ऊर्जा ठरवण्यात येते. सादरीकरणावेळी वापरण्यात येणाऱ्या पॉईंटरसाठी १ ते ५ मिलीवॅट ऊर्जेचे लेझर वापरण्यात येतात. सीडी रॉम ड्राईव्हमध्ये ५ मिलीवॅट लेझर वापरण्यात येतात. ५ ते १० मिलीवॅटचे लेझर डीव्हीडी प्लेअरमध्ये असतात. हाय स्पीड बर्नरमध्ये १०० मिलीवॅटचे लेझर असतात. दोन्ही बाजूने रेकॉर्डिंग करणाऱ्या यंत्रणेमध्ये ४०० मिलीवॅट लेझर असतात. होलोग्राम बनवण्यासाठी केवळ एक वॅटचा लेझर पुरेसा ठरतो. वैद्यक क्षेत्रात त्वचारोग, कर्करोग शस्त्रक्रियेसाठी ३० ते १०० वॅटचे लेझर वापरतात, तर धातू कापण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या लेझर उपकरणांची ऊर्जा १०० ते ३००० वॅट इतकी असते. एक मिलीवॅटपासून ३००० वॅट इतक्या मोठ्या ऊर्जा पट्ट्यामध्ये लेझर किरण उपलब्ध असतात.

यातील अगदीच कमी म्हणजे एक ते पाच मिलीवॅट क्षमतेचे लेझर किरण अपायकारक नसतात. मात्र, अगदी कमी ऊर्जेच्या लेझर किरणांच्या संपर्कात डोळ्यासारखा नाजूक भाग दीर्घकाळ राहिल्यास डोळ्यांना इजा पोहोचू शकते. एक वॅटपेक्षा जास्त ऊर्जेच्या लेझर किरणांचा त्वचेशी जास्त काळ संपर्क राहिल्यास त्वचा जळते. असे असतानाही केवळ आपल्या मिरवणुकीकडे लोकांचे लक्ष वेधले जावे यासाठी लेझर उपकरणांचा रोषणाईसाठी मोठ्या प्रमाणात वापर सुरू झाला. मागील काही वर्षांपासून लेझर उपकरणांच्या वापराने झगमगाट वाढला. मात्र, लेझर किरणामुळे एका युवकाने डोळा गमावला आणि त्याच्या घातकपणाची कल्पना आली. लेझरची रोषणाई घातकच!

vilasshindevs44@gmail.com
संपर्क : ९६७३७८४४००